सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १२७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ११ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## बच्चूभाऊंनी शेतकऱ्यांच्या केलेल्या मागण्या मान्य करा... अन्यथा सळो कि पळो करून सोडू - मनोज जरांगे पाटील



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११गुरुकुंज मोझरी**

अनेक वर्षांपासून प्रहार पक्षाचे अध्यक्ष बच्चू भाऊ कडू मोठ्या ताकदीने, हिमतीने संघर्ष करत आहेत. आंतरवली सराटी या ठिकाणी जेव्हा मी उपोषणास बसलो होतो तेव्हा तुम्ही मला तब्बेतीची काळजी घ्या, असे सांगितले होते. आता मी तुमच्या ठिकाणी तुम्हाला भाऊ काळजी घ्या असे सांगत आहे. बच्चूभाऊ तुम्ही एकटे नाही आम्हीही तुमच्या सोबत आहोत. बच्चू भाऊ आपल्यासाठी उपोषण करत असतील तर त्यांच्यासाठी काहीही करायला आपण तयार आहोत. तुमच्या मागण्या मान्य



न केल्यास या सरकारला सळो कि पळो करून सोडू, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना चांगलं माहिती असल्याचे सांगत मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी थेट इशारा दिला.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह अन्य १७ मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांचे मोझरी येथे आंदोलन सुरु आहे. आज आंदोलनाच्या चौथ्या दिवशी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी बच्चू कडू यांची भेट घेतली. यावेळी मनोज जरांगे पाटील म्हणाले की, या ठिकाणी प्रत्येकजण येतो भाषण ठोकून निघून जातो. हि भाषण



ठोकण्याची या राज्यातील प्रथा आता मोडून काढली पाहिजे. या ठिकाणी येणे, भाषण करणे पाठिंबा देणे यापेक्षा रस्त्यावर उतरले पाहिजे.

बच्चू कडू यांच्या मागण्याची मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दखल घ्यावी. राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी जात-पात न पाहता रस्त्यावर उतरायला हवं. कारण जीवाची बाजी लावणं सोपं नाही' असे मनोज जरांगे यांनी यावेळी मनातले. शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीसाठी, शेतमजुर व दिनदलितांच्या हक्कासाठी प्रहार पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी चार दिवसांपासून आंदोलन सुरु केले आहे. त्यांच्या आंदोलनास आमचा पाठिंबा असल्याचे देखील जरांगे पाटील यांनी म्हंटले आहे.

## ऑपरेशन सिंदूरमध्ये सपाटून मार खाल्लेल्या पाकिस्तानला डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून मोठा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११वॉशिंग्टन**

भारत आणि पाकिस्तानमध्ये वाढलेल्या तणावावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प काहीतरी वेगळंच राजकारण करत असल्याचं समोर येतंय. ऑपरेशन सिंदूरमध्ये दणदणीत पराभव पत्करलेल्या पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांना अमेरिकेने २५० व्या आर्मी डे परेडसाठी निमंत्रण दिले आहे. मुनीर १२ जून रोजी अमेरिकेत दाखल होणार असून, १४ जून रोजी होणाऱ्या समारंभात ते सहभागी होणार आहेत.

सीएनएन-टीव्ही १८ च्या वृत्तानुसार, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष




डोनाल्ड ट्रम्प, असीम मुनीर यांच्याशी भेटीत भारत आणि अफगाणिस्तानातील दहशतवादी हल्लयांबाबत चर्चा करणार असल्याची माहिती आहे. तसेच पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटनांवर त्वरित कारवाई करण्याची मागणी करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने ६ आणि ७ मे रोजी पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळांवर हल्ले केले. त्यामध्ये १०० हून अधिक दहशतवादी मारले गेल्याची माहिती आहे. त्यानंतर पाकिस्तानने भारतावर अयशस्वी हल्ला करण्याचा प्रयत्न केला. १० मे २०२५ रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धबंदीवर सहमती करण्यात आली.

दहशतवादाचे माहेरघर म्हणून जगप्रसिद्ध असणारा पाकिस्तान आता संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवादी विरोधी समितीचा उपाध्यक्षपद असणार आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये १५ सदस्य असतात. त्यामध्ये ५ स्थायी सदस्य (अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स, युनायटेड किंगडम) आणि १० अस्थायी सदस्य असतात. अस्थायी सदस्यांची निवड दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी होते. २०२५ मध्ये पाकिस्तान अस्थायी सदस्य म्हणून सुरक्षा परिषदेत सामील झाला आहे. त्यामुळे त्यांना परिषदेच्या विविध समित्यांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते.

## ना नितीश कुमार, ना पंतप्रधान नरेंद्र मोदी...बिहारच्या युवकांची पहिली पसंती कोण?; सर्व्हेने सगळेच हैराण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११पटणा**

बिहारमध्ये या वर्षीच्या अखेरीस होणाऱ्या विधानसभा निवडणुकीआधी राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. प्रत्येक पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागला आहे. त्यातच झेश्रश्र ढीरलज्ञशी ओपिनियन पोलमध्ये हैराण करणारी आकडेवारी समोर आली आहे. या आकडेवारीनुसार राज्यातील युवकांमध्ये सर्वात लोकप्रिय नेता म्हणून राहुल गांधी यांचं नाव पुढे आले आहे. तुमचा आवडता राष्ट्रीय नेता कोणता असा प्रश्न युवकांना विचारला होता. त्यावर ४७ टक्के युवकांनी राहुल गांधी यांचे नाव घेतले तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ३९ टक्के युवकांनी पसंती दर्शवली तर १४ टक्के युवकांनी इतर नावाला पसंती दिली.

बिहारमध्ये नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान विधानसभा निवडणुका होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत महाआघाडीविरुद्ध एनडीए अशी थेट लढत होईल. परंतु या निवडणुकीत अनेक समीकरणे बदलले आहेत. जानेवारी २०२४ मध्ये नितीश कुमार यांनी महाआघाडीची साथ सोडून एनडीएसोबत गेलेत. त्यामुळे राज्याच्या राजकारणाला नवे वळण लागले. भाजपा आणि जेडीयू यांनी मिळून राज्यात सरकार बनवले. नितीश कुमार मुख्यमंत्री म्हणून मैदानात उतरले. दुसरीकडे विरोधकांकडून महाआघाडीचे नेतृत्व तेजस्वी यादव करू शकतात.



Poll Tracker सर्व्हेनुसार, बिहारच्या युवकांमध्ये राहुल गांधी यांची लोकप्रियता वाढली आहे. ४७ टक्के युवकांची पहिली पसंती राहुल गांधी यांच्या नावाला आहे. त्यामुळे यंदाच्या बिहार निवडणुकीत काँग्रेस सहकार्याच्या नव्हे तर निर्णायक भूमिकेत दिसू शकते. काँग्रेसने अद्यापही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा स्पष्ट केला नाही. त्यामुळे महाआघाडीत अद्याप संभ्रम आहे.

दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकीत प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पार्टीही मजबूतपणे उतरणार आहे. येणाऱ्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाची मोठी भूमिका राहू शकते. बिहारमध्ये तिसरा पर्याय म्हणून प्रशांत किशोर यांना लोक किती साथ देतात हे निवडणुकीच्या निकालातूनच दिसून येईल. मात्र प्रशांत किशोर यांच्या राजकारणामुळे एनडीएसह महाआघाडीलाही आव्हान निर्माण झाले आहे.

## दादा 'ते' गुलाबी जॅकेट घालण्याइतकं सोप नाही; हाकेंनी पुन्हा अजित पवारांना डिवचलं

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

महाराष्ट्राचं मुख्यमंत्री होण हे काय गुलाबी जॅकेट घालण्याइतकं सोप नाही. अजित पवरांना मुख्यमंत्री होण्याचं गुलाबी आणि दिवा स्वप्न पडत आहेत असं म्हणत ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर तोफ डागली आहे. गेल्या काही दिवसांपासून हाके आणि अजित पवार असा संघर्ष पाहायला मिळत आहे. हाके यांच्या टार्गेटवर सध्या अजित पवार



असल्याचं दिसत आहे.

कारखानदारी, खासगी कंपन्या काढून आणि लोकांना लुबाडून मुख्यमंत्री होता येत नाही. त्यासाठी १२ ते १३ कोटी लोकांच काही दायीत्व असावं लागत असही हाके यावेळी म्हणाले आहेत. यांच काय फक्त गुलाबी जॅकेट घातलं की यांना वाटत झालं. मात्र, तसं केल्याने काही होत नसत. मुख्यमंत्री होण तर सोडच असंही हाके यावेळी म्हणाले आहेत. त्याचबरोबर त्यांनी यावेळी यांच्या काकाला दोन अडीच जिल्ह्याच्या बाहेर जाता आलं नाही तर यांना काय जमणार असं म्हणत शरद पवारांनाही टोला लगावला आहे.

मी गोरगरीब ओबीसी समाजासाठी आणि त्यांच्या हक्क अधिकारांसाठी लढत असून अर्थ खात्याला गोचीडासारखा चिटकून बसलेला अजित पवार हा ओबीसी समाजाचा निधी देत नसल्याने माझा त्यांच्याशी वाद आहे. मात्र, ओबीसी समाजाचा अडवलेला निधी देण्याऐवजी राष्ट्रवादीचे पदाधिकारी नागपूरपासून पंढरपूरपर्यंत ज्या पद्धतीने धमक्या देऊ लागली आहेत ते पाहता माझ्यावर हल्ला झाल्यास या संपूर्ण पवार कुटुंब जबाबदार असेल असा इशारा हाके यांनी दिला आहे.

## मी नितेशला समज दिली 'बाप'वरून वाद पेटला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

महाराष्ट्राच्या राजकारणात 'बापावरून' चांगलाच वाद सुरू झाला आहे. भाजप आमदार नितेश राणे यांनी महायुतीमधील मित्र पक्षांवरच जाहीर सभेमधून केलेल्या वक्तव्याचे पडसाद उमटल्याचं पाहायला मिळालं. या विधानावरुन नितेश राणेंचे वडील नारायण राणे यांनीही मुलाचे कान टोचले आहेत.




बाप म्हणणं चुकीचं आहे. मी याबद्दल त्याला बोललेलो आहे. मुख्यमंत्री महाराष्ट्राच्या जनतेचा सेवक असतो. कोणाचा बाप नसतो. मी मुख्यमंत्री होतो, तेव्हा लोकांना सांगायचो की मला साहेब म्हणू नका. मी महाराष्ट्राच्या जनतेचा सेवक आहे. तीच समज मी नितेशला दिलेली आहे.

**नितेश राणे यांचे वादग्रस्त विधान**

धाराशिव जिल्ह्यातील जाहीर सभेला संबोधित करताना नितेश राणे यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा अपमान केला होता. यावेळी बोलताना त्यांनी म्हटलं होतं की, धाराशिव जिल्ह्यात शिंदे सेनेचे नेते कितीही ताकद दाखवण्याचा प्रयत्न करत असले, तरी सर्वांचा बाप राज्याचे मुख्यमंत्री भाजप नेता आहे.

## जमत असेल तर उपोषण सोडा, नाहीतर राहू द्या चंद्रशेखर बावनकुळें भाषा दमदाटीची होती - बच्चू कडू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांनी शेतकर्यांना संपूर्ण कर्जमाफी, त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती, दिव्यांग, विधवा महिलांना ६ हजार रुपये मानधन, वंचित घटकांचे प्रश्न या मागण्यांसाठी अमरावती येथील मोझरी येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाचा आज चौथा दिवस आहे. त्यांच्या या उपोषणाने राज्य सरकारचे लक्ष वेधले गेले आहे. बच्चू कडू यांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी फोन केल्याची माहिती समोर अली आहे. परंतु बावनकुळे यांच्याशी झालेल्या संभाषणानंतर कडूंनी नाराजी व्यक्त केली आहे.



चंद्रशेखर बावनकुळे यांनी वापरलेल्या भाषेवर बच्चू कडू यांनी आक्षेप घेतला आहे. ते म्हणाले, सरकारने सरकारचे काम करावे, आम्ही आमचे काम करू. शेतकऱ्यांसाठी शेवटपर्यंत काम करत राहू. बावनकुळे यांच्याशी बोललो. कॉल रेकॉर्ड असता तर दाखवले असते ते कसे बोलले. ते म्हणाले की जमत असेल तर उपोषण सोडा, नाहीतर राहू द्या. ही भाषा आहे का? असे म्हणत बच्चू कडू यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

दरम्यान, चंद्रशेखर बावनकुळे यांनी बच्चू कडू यांनी केलेल सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. बावनकुळे म्हणाले, कडू यांचे वक्तव्य अत्यंत चुकीचे आहे. मी आदरपूर्वक बोललो आहे. त्यांना विनंती केली की मुंबईमध्ये बैठक लाऊ. मी त्यांची विचारपूस करण्यासाठी पोलिस अधीक्षक, जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले होते. वेगवेगळ्या विभागाचे प्रश्न बच्चू कडू यांनी मांडले आहेत. त्यांनी चुकीच्या पद्धतीने बोलवू नये. आंदोलनाला बसलेल्या व्यक्तींची काळजी घेऊ. तसेच मुख्यमंत्र्यांशी बोलून तातडीने बैठक घेऊ, असेही त्यांनी सांगितले आहे.

## आदित्य ठाकरे पर्यावरण मंत्री असताना सर्वात जास्त झाडांचा खून - आशिष शेलार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११कऱ्हाड**

मुंबईतील सर्वात जास्त झाडांचा खून हा आदित्य ठाकरे पर्यावरण मंत्री असताना झाला आहे. त्यांनी आपल्या महापालिकेतील विकासकाला जास्तीत जास्त फायदा व्हावा म्हणून प्रत्येक वर्षी ६ ते ७ हजार झाडांची कत्तल केली आहे. त्यामुळे त्यांना दुसऱ्यांवर बोलण्याचा नैतिक अधिकार नाही असे मत भाजपचे प्रवक्ते आशिष शेलार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. आदित्य ठाकरे यांनी केलेल्या ट्विट बाबत माध्यमांनी त्यांना प्रश्न केला होता.



बुधवारी आशिष शेलार कराड दौऱ्यावर आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार डॉ.अतुल भोसले, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर उपस्थित होते.

शेलार म्हणाले, भारतीय जनता पक्ष आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे पक्षाची व्याप्ती वाढत आहे. भाजप मजबूत झाला तरच महायुती मजबूत होणार असून सबका साथ सबका विकास हीच भाजपची भूमिका राहिली आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मी निधी देत नाही अशी टीका करणाऱ्यांना मी पैसे खिशात घेऊन फिरतो काय? असा सवाल केला आहे. याबाबत विचारताच, मी त्याबाबत काही ऐकलेले नाही. असे सांगत त्या प्रश्नाला बगल दिली.

**त्यांना बेईमानीची व्याख्या शिकवावी लागेल**

महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी एकनाथ शिंदे शिवसेनेत केलेल्या प्रवेशबाबत संजय राऊत यांनी टीका केली आहे. याबाबत छेडले असता शेलार म्हणाले, खरंतर त्यांना बेईमानी ची व्याख्या शिकवावी लागेल. कारण चंद्रहार पाटील यांनी केलेला प्रवेश हा स्वतःच्या मर्जीने केलेला प्रवेश आहे .या उलट महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वात मोठी बेईमानी उद्धव ठाकरेंनी केली. त्याचे मूळ संजय राऊत आहेत. ते आमच्या बरोबर राहिले, निवडणूक लढले आणि त्यानंतर सत्तेसाठी निघून गेले. त्यांना खरंतर 'बेईमान ऑफ महाराष्ट्र' हा किताब दिला पाहिजे असा टोला त्यांनी लगावला.

## संपादकीय ......

# हमी भाववाढीचा आधार

केंद्र सरकारने खरीप हंगाम २०२५-२६ मधील १४ पिकांसाठीचे हमीभाव जाहीर केले असून, सर्व पिकांना उत्पादनखर्च अधिक ५० टक्के हमीभाव दिल्याचा दावा केला आहे. अर्थातच, शेतकरी संघटनांनी तो फेटाळून लावला आहे. तसेच यूपीए सरकारच्या कार्यकाळात विद्यमान सरकारपेक्षा एमएसपीमध्ये अधिक वाढ केली होती, अशी मांडणीही संघटनांकडून केली जाते. मोदी सरकारने हमीभावातील वाढ ही डिजिटल प्रणाली, श्रीअन्न धोरण व राष्ट्रीय आत्मनिर्भरतेच्या दिशेने वापरली. प्रत्यक्षात शेतकरी स्वतःहून बाजारात हमीभावांपेक्षा अधिक दर मिळवू लागेल, तेव्हाच या संकल्पनेला खरा अर्थ प्राप्त होईल.

भारतातील कृषी व्यवस्था ही आजही मुख्यतः अनिश्चित बाजारभावांवर आधारित आहे. त्यामुळे शेतकर्यांच्या उत्पादनाला बाजारपेठेत न्याय्य दर मिळावा, यासाठी केंद्र सरकार दरवर्षी काही निवडक पिकांसाठी किमान आधारभूत किंमत (एमएसपी) जाहीर करते. यापेक्षा कमी दराने कोणताही व्यापारी शेतकर्यांकडून पीक खरेदी करू शकत नाही. तसेच सरकारकडून करण्यात येणारी खरेदीही एमएसपीपेक्षा कमी दराने करता येत नाही. एमएसपी संकल्पना भारतात प्रथम १९६६-६७ मध्ये लागू झाली. त्याकाळी हरित क्रांतीला चालना देण्यासाठी शेतकर्यांना हमीभाव देणे आवश्यक होते. सुरुवातीला फक्त गहू व धान्यासाठी एमएसपी जाहीर होत असे. नंतरच्या काळात कापूस, ज्वारी, बाजरी, डाळी, तीळ, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, राळा यांसह २२ पेक्षा अधिक पिकांना हमीभावांचे सुरक्षाकवच लाभले.आजघडीला देशात एफसीआय (भारतीय अन्न महामंडळ) आणि नाफेड यांसारख्या संस्था एमएसपीवर खरेदी करतात. हे धोरण केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचे आहे. कारण, देशातील ५० टक्के लोकसंख्या अजूनही शेतीवर अवलंबून आहे. एमएसपीमुळे शेतकर्यांना उत्पन्नसुरक्षा लाभते. कारण, पुरवठाचक्रातील बदलामुळे किंवा अन्य कारणांमुळे बाजारात शेतीपिकांचे दर घसरले, तरी सरकार हमीभावाने माल खरेदी करते. यामुळे अनिश्चिततेच्या काळातही शेतकर्यांना निश्चित उत्पन्नाची हमी मिळते. हमीभाव हे अन्नसुरक्षा धोरणाचे मूळ आहे. तसेच अन्नधान्योत्पादनातील स्वयंपूर्णतेसाठी आणि कृषी निर्यातीसाठीही एमएसपी महत्त्वाची आहे. कारण, सरकार ज्या पिकांचे हमीभाव वाढवते, त्या पिकांची लागवड अधिक होते.

२००४ ते २०१४ या दहा वर्षांच्या काळात डॉ. मनमोहन सिंग सरकारने मुख्यतः धान, गहू, कापूस यांसारख्या प्रमुख पिकांवर भर दिला. शेतकर्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी, म्हणून अनेक वेळा एमएसपी वाढवली गेली. २००८ मध्ये आलेल्या जागतिक आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत मागणी आणि शेतकर्यांचे उत्पन्न टिकवण्यासाठी एमएसपीत मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली. धानाचा एमएसपी २००५ मध्ये ५७० रुपये प्रति क्विंटल होता, तो २०१३ पर्यंत १३१० झाला. गव्हाचा एमएसपी ६४० वरून १,३५० रुपयांपर्यंत गेला. कापसाचा एमएसपी १,७६० वरून ३,९०० रुपयांपर्यंत वाढवण्यात आला. मोदी सरकारने एमएसपीमध्ये सातत्याने वाढीचे धोरणही कायम ठेवत शेतकर्यांच्या उत्पन्नवाढीला चालना देण्याचा प्रयत्न केला. एकंदरीत, केंद्र सरकारने आता जाहीर केलेली किमान आधारभूत किमतींमधील वाढ ही बळीराजाला प्रोत्साहन देणारी आहे, याबाबत दुमत नाही. पण, त्यावरून राजकारण किंवा आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा समन्वयाने मार्ग काढणे गरजेचे आहे.







## मूठभर कांद्याच्या टरफलांनी करा नॅचरल हेअर कलर, पांढरे केसही होतील १५ मिनिटांत काळेभोर...

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

केसांच्या अनेक समस्यांमध्ये केसगळती व केस अकाली पांढरे होणे या दोन समस्या फारच कॉमन आहेत. आजकाल आपल्यापैकी बऱ्याचजणांना फारच कमी वयात केसगळती व केस अकाली पांढरे होणे यांसारख्या समस्या सतावतात. या समस्यांवर उपाय म्हणून आपण अनेकदा इन्स्टंट आणि लगेच झटपट परिणाम दिसून येतील अशाच उपायांवर अधिक भर देतो. परंतु अशा इन्स्टंट उपायांचे परिणाम हे देखील तात्पुरतेच असतात. पांढऱ्या केसांना काळे करण्यासाठी आणि केसगळती थांबवण्यासाठी आपण बाजारातून वेगवेगळ्या पद्धतीची महागडी ब्युटी प्रॉडक्ट्स विकत घेतो. पण त्यातील केमिकल्समुळे केसांची मुळं कमजोर होतात, केस गळायला लागतात आणि केसांच्या समस्यां सुटण्याऐवजी आणखीनच वाढतात. पण जर आपल्याला हे सगळं टाळून केसांना रंग द्यायचा असेल आणि त्याचवेळी पोषणही द्यायचं असेल, तर कधीही नैसर्गिक घरगुती उपाय करणेच उत्तम राहील.

कांद्याची टरफलं, जी आपण सहसा फेकून देतो, त्यामध्ये अशी काही नैसर्गिक रंगद्रव्य असतात जी पांढऱ्या केसांना रंग देण्यासाठी आणि केसांच्या वाढीसही मदत करतात. यासोबत इतर घरगुती घटक जसे कलोंजी, मेथी दाणे, अळशीच्या बिया, रोझमेरी, खोबरेल तेल वापरून आपण घरच्याघरीच सुरक्षित नॅचरल हेअर डाय बनवू शकतो.

**साहित्य :-**

१. कांद्याची टरफलं - २ ते ३ कप
२. कलोंजी - २ टेबलस्पून
३. मेथी दाणे - २ टेबलस्पून
४. अळशीच्या बिया - २ टेबलस्पून
५. रोझमेरी - १ टेबलस्पून
६. खोबरेल तेल - ३ ते ४ टेबलस्पून

**याचा वापर कसा करावा?**

या तयार मिश्रणापासून नैसर्गिक व घरगुती पद्धतीने हेअर डाय तयार करण्यासाठी, एका बाऊलमध्ये तयार बारीक पावडर घेऊन त्यात गरजेनुसार खोबरेल तेल मिसळून घ्यावे. खोबरेल तेल घालून गरजेनुसार, हे मिश्रण पातळ करून घ्यावे. तयार नॅचरल हेअर डाय ब्रशच्या मदतीने केसांवर लावून घ्यावा. अर्धा ते एक तास हे मिश्रण केसांवर असेच लावून ठेवावे. त्यानंतर केस स्वच्छ धुवून घ्यायवेत. आठवड्यातून किमान १ ते २ वेळा हा उपाय केल्यास केस काळेभोर, घनदाट, लांबसडक तर होतातच तसेच केसगळती सारख्या केसांच्या अनेक समस्या दूर होण्यास मदत होते.

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाची भेट संतोषदेव महाराज यांना प्रदान

## भारतासह २३ देशांतील ३० हजारांहून अधिक हिंदूंनी नोंदवला उत्स्फूर्त सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**



हिंदू धर्मप्रेमींसाठी १७ ते १९ मेदरम्यान फर्मागुडी, फोंडा (गोवा) येथे सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात भारतासह २३ देशांतील ३० हजारांहून अधिक हिंदूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यामध्ये जिल्ह्यातील ३०० पेक्षा अधिक हिंदू धर्मप्रेमींनी उपस्थिती दर्शवली होती. महोत्सवानिमित्त सच्चिदानंद परब्रह्म परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांनी संतोषदेव महाराज यांना विशेष भेटवस्तू पाठवली. ही भेट वस्तू महाराजांना त्यांच्या शहरातील सिंधूनगर स्थित शिवधारा आश्रमात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आली.

संत-महात्मे, विद्वान वक्ते, लेखक तसेच सनातन राष्ट्रहितैषी विविध मान्यवरांनी या महोत्सवात मार्गदर्शन करत उपस्थित हिंदूंना दिशा दिली. या महोत्सवातून राष्ट्रीय एकात्मता, भारतीयत्वाची भावना, आध्यात्मिक ऊर्जा, सांस्कृतिक चेतना आणि शौर्य यांचा प्रभावी जागर घडला.

# शासन योजनेचा लाभ आता एकाच छताखाली

## आ. संदीप जोशी यांच्या कार्यालयात नागरिक सेवा केंद्राचा आज शुभारंभ

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.११नागपूर**



ग्रामपंचायत विविध राज्य योजनांचा लाभ एकाच ठिकाणी , तसेच त्यांच्याशी संबंधित समस्या प्रभावीपणे सोडवता याव्यात , या उद्देशाने महिला संदीप जो आर . पी . टी . एस . रोड , नगर जनसंपर्क कार्यालय लक्ष्मी ' सरकारी योजना व नागरिक सेवा केंद्र ' चा शुभारंभ बुधवार ११ जून रोजी सकाळी १० वाजता होणार आहे .

कार्यक्रमाचे उद्घाटन राज्यमंत्री ना .डॉ .पंकज भोयर यांचे हस्ते होणार आहेत , अध्यक्षस्थानी भाजपा शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी असतील. या केंद्रस्थानी केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली जाईल .अर्ज करण्यापासून ते लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणारे हे केंद्र नागपूरकरांसाठी उपयुक्त ठरणार आहे. नागरिकांसाठी आणि त्यांच्यासाठी हे सेवा केंद्र उभारण्यात आले , शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक क्षण शोधणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे . या केंद्राचा लाभ घ्यावा , असे आवाहन सदस्य संदीप जोशी यांनी केले आहे.

# खरिपाची कामे करतांना ट्रॅक्टरच्या क्लच प्लेटबाबत 'या' गोष्टी लक्षात ठेवा!




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ कृषी**

अलीकडे शेतीकामांसाठी ट्रॅक्टरचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. खरीप हंगामाला सुरवात झाली असून यातमशागतीसाठी ट्रॅक्टरचा वापर केला जातो. अशावेळी ट्रॅक्टरची विशेष काळजी घ्यावी लागते. जेणेकरून कामाच्या दिवसांत ट्रॅक्टरला कोणतीही अडचण येता कामा नये.

एक जबाबदार शेतकरी त्याच्या ट्रॅक्टरची शक्य तितकी काळजी घेतो. शेतकरी त्याच्या इंजिनपासून टायरपर्यंत सर्व गोष्टींची काळजी घेतो. जेणेकरून ट्रॅक्टरची लाईफवाढेल, मेंटेन राहील. पण ट्रॅक्टरची काळजी घेतल्यानंतरही, बरेच शेतकरी चालवताना काही चुका करतात. ज्यामुळे अनवधानाने इंजिनमध्ये मोठ्या समस्या निर्माण होतात.

यातील एक महत्वाची गोष्ट म्हणजे हाफ क्लचिंग (Incomplete Clutching). या एका गोष्टीमुळे, ट्रॅक्टरची क्लच प्लेट हळूहळू कधी खराब होते, हे ट्रॅक्टर चालकाला कळतही नाही. ट्रॅक्टरच्या क्लच प्लेटला नुकसान म्हणजे मोठा खर्च. म्हणूनच, ही समस्या टाळण्यासाठी काय काळजी घ्यावी हे समजून घेऊया....

**हाफ क्लचिंग म्हणजे काय?**

ट्रॅक्टर चालवताना जेव्हा तुम्ही क्लचला ॲक्सिलरेटरसह अर्धा किंवा थोडा दाबून ठेवता, तेव्हा याला सामान्यतः हाफ क्लचिंग किंवा अपूर्ण क्लचिंग म्हणतात. हे ड्रायव्हरला हे देखील कळत नाही की तो ट्रॅक्टर अर्ध्या क्लचवर चालवत आहे, कारण हळूहळू ही ड्रायव्हरची सवय बनते.

हे केवळ ट्रॅक्टरच्या बाबतीतच नाही तर कार आणि मोटरसायकल चालकांच्या बाबतीतही घडते. जेव्हा ट्रॅक्टर नांगरणी, पेरणी किंवा इतर कोणतेही कामासाठी चालवण्यासाठी वापरला जात असेल तेव्हा अशा वेळी हाफ क्लचिंग जास्त होते.

**हाफ क्लचिंगचे तोटे**

जेव्हा क्लच फ्लायव्हीलमधून पूर्णपणे सुटत नाही, तेव्हा गियर रिंग्जमध्ये सतत घर्षण होते. अशा परिस्थितीत गियर बदलणे कठीण होते. जेव्हा हे वारंवार आणि बराच काळ घडत राहते, तेव्हा गिअरबॉक्स खराब होतो. जेव्हा क्लच पूर्णपणे गुंतलेला नसतो, तेव्हा इंजिनचा ठझच् वाढतो. इंजिन आणि क्लच प्लेट दोन्हीवर दबाव वाढतो.

आवश्यकतेपेक्षा जास्त अर्धा क्लचिंग केल्याने क्लच घसरतो. यामुळे, क्लच प्लेट लवकर गरम होते आणि जेव्हा ट्रॅक्टर बराच वेळ चालतो, तेव्हा क्लच प्लेट जळू लागते. एकदा क्लच प्लेट खराब झाली की, ती दुरुस्त करण्यासाठी शेतकऱ्याला मोठा खर्च सहन करावा लागतो.

**ते टाळण्याचे मार्ग काय आहेत?**

पहिला मार्ग म्हणजे जर तुम्ही जाणूनबुजून किंवा अजाणतेपणे अर्धे क्लचिंग करत असाल, तर शक्य तितक्या लवकर तुमची सवय सुधारा. गरज नसताना, तुमचा पाय क्लच पेडलवरून काढा किंवा डेड पेडलवर ठेवा. यासोबतच, जेव्हा जेव्हा तुम्हाला गियर बदलायचा असेल, तेव्हा क्लच पूर्णपणे दाबण्याचा प्रयत्न करा.

सहसा ट्रॅक्टरचे क्लच खूप घट्ट असतात, परंतु तरीही क्लच पूर्णपणे दाबण्यात आळशी होऊ नका. जेव्हा तुम्ही सर्व्हिसिंगसाठी जाता तेव्हा ट्रॅक्टरचा क्लच योग्यरित्या तपासा. सहसा, सर्व्हिसिंग दरम्यान खूप कमी लोक क्लच प्लेटकडे लक्ष देतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुम्ही चांगल्या दर्जाचे क्लच ऑइल वापरणे, कारण ते खूप दिवसांनी बदलते.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# ना श्रीमंतीचा बडेजाव ना इव्हेंट, हरिपाठाच्या गजरात पार पडले शुभमंगल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ यवतमाळ**

हल्ली विवाह सोहळे श्रीमंतीचा बडेजाव आणि 'इव्हेंट' झाले असताना यवतमाळ तालुक्यातील बोरी (अरब) येथे हरिपाठाच्या गजरात साधेपणाने साजऱ्या झालेल्या विवाह सोहळ्याने सर्वांचे लक्ष वेधले. मराठी संस्कृतीतील अध्यात्म, भक्ती आणि पारंपरिक मूल्यांचे जतन करत बोरी अरब येथील 'नामसाधना' संस्थानात रविवार, ८ जून रोजी हा आगळावेगळा विवाह सोहळा पार पडला.

बोरी (अरब) येथील मुकींदराव गावंडे यांची कन्या भूमिका आणि पंढरीराव ठाकरे (रा. खर्डा) यांचे चिरंजीव अजय यांचा हा विवाह वारकऱ्यांच्या उपस्थितीत, हरिनामाच्या गजरात विठोबाच्या कृपाछायेत, हरिपाठाच्या भक्तीत पार पडला. या विवाहाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, या प्रसंगी श्री संत ज्ञानेश्वर हरिपाठ मंडळ, हातगाव यांनी पारंपरिक पद्धतीने हरिपाठ सादर केला. टाळ, मृदंग आणि विठ्ठलनामाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला. ओव्यांच्या मधूर लयींनी आणि पांडुरंगाच्या स्मरणाने हा विवाहसोहळा एक



अध्यात्मिक उत्सव ठरला.विवाहमंडपात सुरू असलेल्या हरिपाठाच्या ओव्यांमधून नवविवाहित जोडप्यावर प्रेम, आशीर्वाद आणि चैतन्याचा वर्षाव होत होता. उपस्थित वऱ्हाडी आणि पाहुण्यांनी या भक्तिपूर्ण वातावरणाचा मनःपूर्वक आनंद घेतला. प्रत्येक ओवीतून मिळणारे आध्यात्मिक संदेश आणि नामस्मरणाचे सामर्थ्य अनुभवताना हा विवाह क्षणोक्षणी संस्मरणीय ठरत गेला.

या विवाह सोहळ्याचे नियोजन अत्यंत सुबक आणि शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. वऱ्हाड्यांसाठी पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेण्याची व्यवस्था होती. 'नामसाधना' संस्थेचे कार्य आणि परिसरातील सामाजिक योगदानही पाहुण्यांच्या चर्चेचा विषय ठरला. अजय आणि भूमिका या नवविवाहित जोडप्याने विठोबाच्या आशीर्वादाने आणि उपस्थित भाविकांच्या सदिच्छांनी सहजीवनास प्रारंभ केला. या विवाहाने नाते संबंधांमध्ये भक्ती आणि आध्यात्मिकतेचा समावेश कसा असू शकतो, याचे एक सुंदर उदाहरण उपस्थितांसमोर उभे राहिले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ११ जून २०२५ शहर/ग्रामिण

# अन्नत्याग आंदोलनाचा चवथा दिवस

# बच्चू कडू यांची प्रकृती खालावली

## जिल्हाधिकारी,ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी भेट घेत उपोषण सोडण्याची केली विनंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ गुरुकुंज मोझरी**

अन्नत्याग आंदोलनामुळे माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचे वजन दोन किलोंनी घटले असून रक्तदाब (बीपी) कमी झालेला आहे. शुगर वाढलेली आहे. त्यामुळे प्रकृती खालावलेली आहे. डॉक्टरचा बच्चू कडूंना औषध घेण्याचा सल्ला दिला. मात्र त्यांनी उपचार घेण्यास ठाम नकार दिला. दरम्यान जिल्हाधिकारी आशीष येरेकर व जिल्हा पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनीसुद्धा बच्चू कडू यांची भेट घेत त्यांना उपचार घेण्याची विनंती केली.जिल्हाधिकाऱ्यांनी मध्यस्ती केल्यानंतर बच्चू कडू यांनी रक्तदाबाची गोळी घेण्यास सुरूवात केली.



बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर व जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी भेट देऊन बच्चू कडू यांच्या मागण्यांसंदर्भात त्यांच्याशी चर्चा करीत बच्चू कडूंना उपोषण सोडवण्याची विनंती केली. मात्र बच्चू कडूंनी त्यांची विनंती फेटाळली. सरसकट कर्जमाफीचा निर्णय, दिव्यांगाना सहा हजार रुपये प्रति महिना मानधन व इतर १७ मागण्या जोपर्यंत मान्य होत नाहीत, तोपर्यंत उपोषण सोडणार नाही, असे बच्चू कडू यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षकांना स्पष्ट सांगितले. बच्चू कडू यांच्या आंदोलनाला संपूर्ण राज्यातून पाठिंबा मिळत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधला असून त्यांच्या तब्येतीची विचारणा केली आहे. बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आमदार रोहित पवार हे ११ जून रोजी गुरूकुंज मोझरी येथे असल्याची माहिती आहे.

# मंत्री संजय राठोडांच्या खात्यात बदल्यांमध्ये प्रचंड अनियमितता

## कोट्यवधींचा 'गेम', अनेक अधिकारी कार्यकाळ संपल्यानंतरही खुर्चीवरच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११यवतमाळ**

मुख्यमंत्र्यांच्या रडारवर असलेल्या मृद व जलसंधारण विभागाच्या सर्वसाधारण बदल्यांमध्ये प्रचंड अनियमितता झाली आहे. अनेक अधिकाऱ्यांचा कालावधी संपला असताना, त्यांना पुन्हा 'अर्थ'पूर्ण मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यभरातील सहा विभागांत बदल्यांमध्ये कोट्यवधींचा 'गेम' झाला आहे. त्यामुळे मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड यांच्या खात्यात नेमके चालले तरी काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

मृद व जलसंधारण खात्यातील अधिकाऱ्यांच्या बदली आणि पदोन्नतीने नियुक्त्या ३० मे २०२५ रोजी करण्यात आल्या. मात्र, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोकण, नागपूर, नाशिक आणि पुणे या विभागात उपविभागीय जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट 'अ', सहायक



जिल्हा जलसंधारण अधिकारी, उपविभागीय जलसंधारण या पदांवर कार्यरत अधिकाऱ्यांच्या बदल्या करताना नियमांना फाटा देण्यात आला आहे. विभागनिहाय बदल्यांच्या यादीत कोण अधिकारी कुठे होते आणि कुठे नियुक्ती मिळाली, यातच सर्व काही दडले आहे. या बदली यादीवर मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड यांचा आशीर्वाद असल्याचे दिसून येते.

मृद व जलसंधारण विभागाने अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या करताना 'मर्जी' सांभाळणाऱ्या काही जणांना 'मागणी'नुसार त्याच जागेवर मुदतवाढ दिली आहे. यात राजेश बहुरिया (चंद्रपूर), जी. टी. काळकर (चंद्रपूर), एच. जी. कानडे (मुखेड) यांचा समावेश असून, विदर्भातच मुदतवाढ देण्याचा प्रकार अधिक दिसून येतो. अश्विनकुमार पवार (यवतमाळ), प्रशांत आवंदकर (चांदूर बाजार), मोहिनी धोंडे (नांदगाव खंडेश्वर) यांना खेटून असलेल्या ठिकाणी बदली मिळाली आहे.

मृद व जलसंधारण विभागाच्या ३० मे २०२५ रोजी विविध संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांत यवतमाळ येथील 'पराग'ने महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याची माहिती आहे. यादी 'ओके' करण्याची जबाबदारी त्याच्यावर होती. बदली असो वा मुदतवाढ, 'पराग'च्या माध्यमातूनच करण्याचे फर्मान होते. त्यामुळे चांद्यापासून बांद्यापर्यंतच्या बदलीपात्र अधिकाऱ्यांनी मे महिन्याच्या प्रारंभीच सेटिंग केली होती.

# नव्या प्रभाग पद्धतीनुसार चार नगरसेवकांचा राहणार प्रभाग

## वडाळी,एसआरपीएफ कॅम्प प्रभाग राहणार ३ सदस्यांचा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

राज्य शासनाच्या नगर विकास विभागाच्या मंगळवार, १० जूनच्या अध्यादेशानुसार अमरावती महापालिकेची निवडणूक २०१७प्रमाणे चार सदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार होणार आहे. वडाळी एसआरपीएफ कॅम्प हा लोकसंख्येच्या दृष्टीने लहान असल्यामुळे तीन सदस्यांचा राहणार आहे. शहरात एकूण २२ प्रभागातून प्रत्येकी चार व एका प्रभागात तीन यानुसार ८७नगरसेवक निवडून येतील.

मनपा आयुक्तांना प्रारूप प्रभाग रचना तयार करून जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावी लागणार आहे. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना प्रारूप प्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या मान्यतेसाठी सादर करावी लागणार आहे. राज्य निवडणूक आयुक्त तसेच त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून प्रारूप प्रभाग रचनेला मान्यता दिली जाईल. त्यानंतर महापालिका आयुक्त प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करतील, यानंतर जिल्हाधिकारी हे प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सुचनांवर सुनावणी करतील, सुनावणीच्या अहवालासह अंतिमप्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी सादर करतील, राज्य निवडणूक आयुक्त सुनावणीनंतर प्राप्त अहवालानुसार अंतिम प्रभाग रचनेला मान्यता देतील. सर्वात शेवटी मनपा आयुक्त अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करतील, असेही आदेशात नमूद आहे.



### मनपा 'ड' वर्गात असल्याने ४ सदस्यीय प्रभाग पद्धत

अमरावती महापालिका ही 'ड' वर्गात असल्यामुळे या वर्गवारीत ४ सदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार निवडणूक घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासाठी प्रभाग रचना करणे, आरक्षण ठरवणे, विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करणे तसेच प्रत्यक्ष निवडणूक घेणे अशा तीन टप्यांमध्ये निवडणुकीसाठी काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिकेच्या अनुषंगाने ६ मे रोजी ति आदेशानुसार मनपा तत्काळ घेणे आवश्य ही निवडणूक याचिकेतील निणयाच्या अधीन राहणार असल्याचेही आदेशात स्पष्ट केले आहे.

# आफ्रिकेतील स्पर्धेत अमरावतीच्या १० धावकांचे यश

## १० वेळा खडतर मॅरेथॉन पूर्ण करणारे दिलीप पाटील ठरले चौथे भारतीय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

जागतिक स्तरावर सर्वात आव्हानात्मक अशी 'अनलिमिटेड ह्युमन रेस' म्हणून ओळख असलेली सर्वात जुनी कॉम्रेड मॅरेथॉन आहे. या मॅरेथॉनचे १९२१ पासून आयोजन करण्यात येते. या वर्षी ९८ वी कॉम्रेड मॅरेथॉन दक्षिण आफ्रिकेत रविवार, ८ जून रोजी पीटरमॅरिट्सबर्ग येथे आयोजित केली होती. दक्षिण आफ्रिकेतील वेळे नुसार पहाटे ५.४५ व सकाळी ६ अशा दोन टप्यात कॉम्रेड मॅरेथॉन सिटी हॉल पीटरमॅरिट्सबर्ग येथून सुरू झाली. त्यानंतर डर्बन येथे सायंकाळी ५४५ व ६ वाजता समाप्त झाली.



जगभरातील २४ हजार धावक या स्पर्धेत सहभागी झाले होते. भारतातील ४०३ धावकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. यात ४२ महिला व ३६१ पुरुष होते. अमरावतीचे ११ धावक स्पर्धेत सहभागी झाले. त्यापैकी १० स्पर्धकांनी ही मॅरेथॉन विहित वेळेच्या आधीच पूर्ण करून आपली चमक दाखवून दिली.अमरावती अर्ध मॅरेथॉनचे मुख्य आयोजक व प्रशिक्षक दिलीप पाटील यांनी कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये दहाव्यांदा भाग घेत ही शर्यत ११ तास २७ मिनिटांत पूर्ण केली. पोलिस कर्मचारी राजेश कोचे यांनी ९ तास ४५ मि. व पोलिस निरीक्षक सतीश उमरे यांनी ११ तास ४४ मि. वेळेत शर्यत पूर्ण केली. या दोघांनी सलग दुसऱ्यांदा ही मॅरेथॉन पूर्ण केली असून, त्यांना कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये सलग दोन पदके प्राप्त झाली आहेत.

पहिल्यांदाच भाग घेणारे प्रसिद्ध डॉ. सागर धनोडकर यांनी ११ तास २१ मि., कृषी अधिकारी संजय पाटील यांनी ११ तास ३० मि., सहायक लेखापाल प्रणिता पाटील (निस्ताने) यांनी ११ तास ४४ मि., डॉ. ऋजुता फुके यांनी ११ तास ४७मि., अनिल कांबळे यांनी ११ तास ४८ मि., शिक्षिका रितू तलमले यांनी ११ तास ५३ मि. तर लेखाधिकारी संजय अंबाडेकर यांनी १२ तासांत ही मॅरेथॉन पूर्ण केली.पाईनटाऊन, विन्स्टन पार्क, ड्रयुमाँड, कॉटो रिज, अलमास रोड, मॅकोनडेनी असे ६ कटऑफ पूर्ण करणारा स्पर्धकच या फिनिश लाईनपर्यंत पोहोचू शकतो. या गोठवणाऱ्या थंडीत धावण्याची मजाच खूप वेगळी होती. या मॅरेथॉन दरम्यान ४३ ठिकाणी पाणी, – एनर्जेल, संत्री, केळी, बटाटे, कोक्या पेय व खाद्य पदार्थांची व्यवस्था केली होती. जयहिंद, झिंदाबाद, कमॉन इंडिया, चक दे इंडिया, नमस्ते इंडिया असा उल्लेख करून भारतीय धावपटूंचा आनंद द्विगुणित करण्यात येत होता.

# मनपास्तरीय पाठयपुस्तक वितरणाचा शुभारंभ

## महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या हस्ते उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

समग्र शिक्षा अंतर्गत शासकीय,जि.प.मनपा, खाजगी व अंशता अनुदानीत शाळांना मोफत पाठयपुस्तक वितरण करण्यात येत असते.त्याच अनुषंगाने महानगरपालिका परीक्षेत्रातील एकुण २०७ शाळांना मनपा स्तरावरुन पाठयपुस्तकाचे वितरण करण्यात येणार आहे. यामध्ये मराठी हिंन्दी उर्दु व इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा समावेश आहे. एकुण ४६५९० विद्यार्थींना याचा लाभ मिळणार आहे.२ लाख



९०हजार पुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे. त्या वाटपाचा शुभारंभ महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या हस्ते म.न.पा.मराठी शाळा क्र. १३ चपराशीपुरा व म न पा उर्दु शाळा क्र.०६ चपराशीपुरा येथुन दि. १० जुन रोजी करण्यात आला आहे. शहरातील सर्व शाळांना शाळा शुभारंभ अनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी पुस्तक प्राप्त होतील याप्रकारचे नियोजन महानगरपालिका शिक्षण विभागमार्फेत करण्यात आले आहे. या शुभारंभा प्रसंगी अमित डेंगरे सिस्टीम मॅनेजर हे आर्वजुन उपस्थित होते. या पाठयपुस्तक वितरणाचे काम डॉ.प्रकाश मेश्राम शिक्षणाधिकारी म.न.पा. यांच्या मार्गदर्शनात करण्यात येणार आहे. या शुभारंभ प्रसंगी गोपाल कांबळे केंद्रसमन्वयक, पंकजकुमार सपकाळ सहायक क्रार्यक्रम अधिकारी, संजय बेलसरे, योगेश राणे, निजामुददीन काझी, शुभांगी सुने, सुषमा दुधे विषयतज्ञ या उपस्थित होते.

# निवडणूक आयोगाविरोधात काँग्रेसचा अमरावतीत १४ जूनला मशाल मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

गेल्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या अनियमिततेच्या मुद्द्यावर काँग्रेसने निवडणूक आयोगाला घेरले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी हा निवडणूक आयोग नसून तो भाजपचाच आयोग असल्याची टीका केली आहे. एवढेच नव्हे तर सक्रीय निषेध व्यक्त करण्यासाठी आगामी १४ जून रोजी सायंकाळी ५ वाजता अमरावतीत मशाल मोर्चाचीही घोषणा केली.

या मोर्चाचे माध्यमातून दोषींवर कारवाईच्या मागणीचे निवेदन राज्यपाल आणि राष्ट्रपती यांना पाठविले जाणार आहे. माध्यमांशी संवाद करताना देशमुख म्हणाले, गेल्या विधानसभा निवडणुकीत गंभीर अनियमितता झाली आहे. काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी हा निवडणूक घोटाळा पुराव्यांसह उघड केला आहे. परंतु आयोगाने त्यावर उत्तर दिले नसून भाजपचेच पुढारी पुढे येऊन स्पष्टीकरण देत आहेत. यावरुन



त्यांचा या घोटाळ्याशी संबंध असल्याचेच अप्रत्यक्षपणे त्यांनी मान्य केले आहे. दरम्यान हा घोटाळा यापुढच्या निवडणुकांमध्ये होऊ नये तसेच दोषींवर कारवाई केली जावी, म्हणून काँग्रेसने १४ जूनच्या आंदोलनाची आखणी केली आहे.

देशमुख यांच्यामते जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना निवेदन सोपवून या मोर्चाचा प्रारंभ होणार असून इर्विन चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ या आंदोलनाचा समारोप केला जाणार आहे. त्यांच्यामते महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत आणि त्यानंतरच्या मतमोजणी प्रक्रियेत अनेक संशयास्पद बाबी झाल्या आहेत.

मतदार यादीतील तांत्रिक चुका, ईव्हीएममध्ये हस्तक्षेप आदी मुद्द्यांमुळे निवडणूक आयोगाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आली आहे. काँग्रेस पक्षाने वेळोवेळी यावर आक्षेपही नोंदवले आहेत, पण अद्याप कोणतेही समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. त्यामुळेच काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरला असून आगामी शनिवारचा मोर्चा हा त्याचाच एक भाग आहे. यावेळी खासदार बळवंतराव वानखडे, जिल्हा बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड, माजी संचालक संजय मार्डीकर-वानखडे, सेवादलाचे प्रदीप देशमुख, जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी संजय बेलोकार आदी उपस्थित होते.

# विठूरायाच्या वारीचे राज्यातील नियोजन आज पंढरपुरात ठरणार; एसटी महामंडळाची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११पंढरपूर**

सावळ्या विठ्ठलाच्या दर्शनाला आसुसलेल्या लाखो भाविकांना पंढरीची वारी घडविण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने तयारी सुरू केली आहे. त्यासाठी बुधवारी ११ जूनला एसटीच्या शिर्षस्थ अधिकारी-पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक पंढरपूरला पार पडणार आहे.




आषाढी एकादशीला पंढरपूरात देश-विदेशातील भाविक एकत्र होत असले तरी महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि कर्नाटकमधील भाविकांची संख्या त्यात लक्षणिय असते. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील भाविक सावळ्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी आसूसलेले असतात. ते आषाढी एकादशीची वर्षभर वाट बघत असतात. यावर्षी ६ जुलैला आषाढी एकादशी अर्थात पंढरपूरची यात्रा आहे. प्रवास भाड्यात सुट मिळत असल्यामुळे आणि गावातूनच सेवा मिळत असल्याने शहरीच नव्हे तर ग्रामीण भागातील भाविकही एसटी बसेसनेच पंढरपूरची वारी करण्याला प्राधान्य देतात. दरवर्षीचा हा अनुभव लक्षात घेता आषाढी एकादशीला पंढरीला जाणाऱ्या भाविकांच्या आवागमनात कसूर होऊ नये म्हणून एसटी मंडळाने आतापासूनच नियोजन सुरू केले आहे. या पार्श्वभूमीवर, आज पंढरपुरात एसटी महामंडळाच्या शिर्षस्थ अधिकाऱ्यांची बैठक पार पडणार आहे. यात राज्यातील कोणत्या विभागातून किती बसेस पंढरपूरसाठी सोडायच्या त्याचे नियोजन केले जाणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, यावर्षी ८ दिवसांच्या यात्रेसाठी एसटी महामंडळाच्या नागपूर, अमरावती, नाशिक, पुणे, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर विभागांसह राज्यातून ५ हजारांवर एसटी बसेस पंढरपूर स्पेशल म्हणून राखीव ठेवण्यात येणार असल्याची माहिती आहे. त्यातील एक हजारांवर बसेस या विदर्भातून सोडल्या जाणार आहेत.

# ‘सक्षम’अंतर्गत शालेय जीवनात उद्यमशीलतेला चालना

## उद्यम लर्निंग फाउंडेशनच्या माध्यमातून शासकीय, अनुदानित शाळा, ज्यू. कॉलेजमध्ये राबवला उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

युवकांमधील उद्योजकतेला चालना देण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध उपक्रम राबवले जात आहेत. याच अनुषंगाने शासनाच्या बरोबरीने सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून गत दोन वर्षांत अमरावती जिल्ह्यात शासकीय व अनुदानित शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये उद्यम लर्निंग फाउंडेशनच्या माध्यमातून सक्षम हा विशेष उपक्रम राबवण्यात आला. यातून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये उद्यमशील मानसिकता विकास कार्यक्रम प्रभावी ठरल्याचे निष्पन्न झाले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून हा उपक्रम राबवण्यात आला होता. उद्यम लर्निंग फाउंडेशन ही मेकिन महेश्वरी यांनी ना-नफा तत्वावर स्थापन केलेली संस्था असून १४ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये प्रकल्पाधारित शिक्षणातून उद्यमशील मानसिकता व कौशल्ये विकसित करणे तसेच शिक्षकांना अध्यापनाच्या कौशल्यामध्ये प्रावीण्य मिळवून देणे ही या संस्थेमार्फत राबवण्यात येणाऱ्या ‘सक्षम’ कार्यक्रमाची उद्दिष्टे निश्चित केली होती. विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, आत्मविश्वास आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढवण्यास हा कार्यक्रम मदत करणार असून, या माध्यमातून राज्यातील १७ हजार शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधून ४५ लाख विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. संस्थेने आतापर्यंत १२ राज्यांतील सरकारी शाळा, महाविद्यालय, आयटीआय संस्थांमध्ये २९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना उद्योजकीय शिक्षण दिले आहे.. महाराष्ट्रात दरवर्षी सुमारे १४ लाख युवा मनुष्यबळ दाखल होत असल्याने त्यांच्या हातांना अधिक कौशल्यपूर्ण करण्यासाठी ‘सक्षम’सारख्या कार्यक्रमाच्या माध्यमातून दिले जाणारे प्रोत्साहन अधिक उपयुक्त ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्य शासनाच्या यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये समन्वय साधून ‘सक्षम’ सारखे कार्यक्रम अधिक व्यापक पातळीवर राबवल्यास शिक्षणाच्या माध्यमातून उद्योजकतेचा पाया रुजवण्याचे हे एक प्रभावी उदाहरण ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. तत्पूर्वी २०२३-२४ मध्ये नागपूर जिल्ह्यातील निवडक शाळांमध्ये सक्षम उपक्रम राबवण्यात आला.

जिल्ह्यातील २१२ शाळांमधील ८ हजार विद्यार्थ्यांसोबत कार्यक्रम अमरावती जि. प.च्या २१२ शाळांमधील आठ हजार विद्यार्थ्यांसोबत कार्यक्रम राबवण्यात आला असून, २०२५-२६ मध्ये ४०० शाळांमध्ये विस्तार करण्यात येणार आहे. राज्यात १५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या सक्षम कार्यक्रमामार्फत २५०० हून अधिक व्यवसाय कल्पना सादर करण्यात आल्या, १५०० प्रोटोटाइप तयार झाले, तर ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्पादनांची विक्री केली. एकूणच विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत सकारात्मक बदल दिसून आला असून, ५०० शिक्षकांना उद्योजकतेसंबंधी प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती उद्यम लर्निंग फाउंडेशनच्या वतीने देण्यात आली आहे.

# जलसाठ्याच्या प्रगणनासाठी पर्यवेक्षकांची नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

प्रगणना व जलसाठ्याची दुसरी प्रगणना राबविण्यासाठी दुसरी प्रगणना राबविण्यात येत आहे. जलसाठ्याचय प्रगणनासाठी अधिकारी, कर्मचारी यांची पर्यवेक्षक आणि प्रगणक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.तालुकास्तरीय पर्यवेक्षक आणि प्रगणकांच्या नियुक्तीचे आदेश जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आले आहे. तहसिल कार्यालयाकडून प्राप्त माहितीच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती, अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील लघु सिंचन योजनांची सातवी प्रगणना आणि जलसाठ्याची दुसरी प्रगणना योजना प्रभावीपणे अंमलबजावणी करून कामकाज करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांची पर्यवेक्षक व प्रगणक म्हणून नेमणूक केली आहे.

# शहरामधील अस्वच्छतेवरून खासदार वानखडे यांनी केली मनपा प्रशासनाची कानउघाडणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

शहरातील कचरा, अस्वच्छता आणि प्रत्येक भागातील साचलेले घाणीचे साम्राज्य याबाबत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात मंगळवारी सकाळी ११ वाजता आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत शहरातील अस्वच्छतेबाबत खा. बळवंत वानखडे यांनी मनपा प्रशासनाची कानउघाडणी केली. तत्पूर्वी, खा. वानखडे व माजी आ. डॉ. सुनील देशमुख यांनी मनपाला भेट दिल्याबद्दल त्यांचा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी शाल व पुष्पगुच्छ देत सत्कार केला. या वेळी खासदारांनी शहरातील कचरा, अस्वच्छता आणि प्रत्येक भागातील घाणीचे साम्राज्य या विषयांवर सविस्तर चर्चा करून



संबंधित विभागांना तत्काळ कारवाईचे निर्देश दिले. या बैठकीत पावसाळ्यापूर्वीच्या उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. याबाबत मोहीम हाती घ्यावी, असे निर्देश खासदारांनी दिले.

प्रत्येक वॉर्डासह नाले, गटार साफ सफाई करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले. परिसरातील नाल्यांची साफसफाई बाबत आढावा घेतला. परिसरातील निघणाऱ्या कचऱ्याचे नियोजन करून तांत्रिक पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावावी. नाल्यात कचरा फेकणाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी, असे उपस्थित काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सुचवले.

प्रत्येक अधिकाऱ्याने समन्वयाने काम करावे. कर्मचाऱ्यांनी दिलेली जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडावी. जनतेची कामे वेळोवेळी करून त्यांना सहकार्य करावे, अशी सूचनाही करण्यात आली. या बैठकीत अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर मिलिंद चिमोटे, विलास इंगोले, अशोक डोंगरे, वंदना कंगाले, माजी नगरसेवक बाळू भुयार, प्रदीप हिवसे, मुन्ना राठोड, प्रमोद पांडे, रफिक पत्रकार, सलीम बेग, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, भैया पवार, अधिकारी, पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते उपस्थित होते.

# दाभेरी येथील गीट्टी खदानितून होते दररोज जीवघेणी वाहतूक : महसूल विभाग लक्ष देणार का?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मोर्शी**

महसूल प्रशासनाचे व परिवहन विभागाचे आर्थिक संबंधामुळे दुर्लक्ष रात्रीच्या वेळी अवैध गौण खनिजाची वाहतूक करत असताना काही वेळा मोठे अपघात सुद्धा झाले आहे परंतु वाहनांमध्ये चोरीचे कोण खनिज असल्याने अपघात स्थळावरून रातोरात वाहनातील गौणखणीज आजूबाजूला फेकून चोरावर मोर बनत आहे.परिसरातील नागरिकांमध्ये होत आहे चर्चामोर्शी तालुक्यातील दाभेरी येथे अनेक गिट्टी क्रशर व खदानी आहेत.

त्या ठिकाणी गौण खनिज उत्खननाची परवानगी दिली



आहे. परंतु त्या ठिकाणी शासनाने दिलेल्या परवानगी पेक्षा जास्त उत्खनन होत असून सदर गौण खनिजाची वाहतूक ट्रक व ट्रॅक्टर द्वारे होत असताना त्या रस्त्यावर वाहनातील मुरूम दगड गीट्टी पडल्याने दुचाकी वाहन चालकांना त्या रस्त्यावरून चालताना तारेवरची कसरत करावी लागते. त्याचबरोबर वाहनातील दगड पडल्याने लहान मोठे अपघात सुद्धा घडले . रस्त्यावरून वाहतूक करत असताना वाहनातून मुरूम दगड खाली पडत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही. . त्याचबरोबर मोर्शी तालुक्यातील सर्वच रस्त्यावरून नियमाला डावलून काही वाहनधारक विना नंबरच्या वाहनाने ओव्हरलोड गौण खनिजाची मालवाहतूक गेल्या अनेक दिवसापासून सर्रासपणे सुरू आहे. परवाण्यापेक्षा अधिक माल वाहनात भरून नेत असल्याने काही भागातील रस्त्याची पार दुर्दशा झाली आहे. मात्र याकडे महसूल विभाग परिवहन विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. ओव्हरलोड गिट्टी मुरूम डब्बर वाहतुकीवर आळा घालावा अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. रिद्धपूर दाभेरी या परिसरात दगड खाणी असून यामधून वाहतुकीकरिता हायवा ट्रकचा वापर होत आहे. दाभेरी येथील गीट्टी खदानधारकाने शासनाने दिलेल्या परवानगी पेक्षा जास्त उत्खनन केले असून शासनाची दिशाभूल केली आहे तरी या सर्व बाबीची वरिष्ठांनी दखल घेऊन चौकशी करण्यात यावी अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या अकोला दौऱ्यात आंदोलनाची धास्ती; विरोधी पक्ष, संघटनांचे पदाधिकारी स्थानबद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अकोला**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज अकोला शहराच्या दौऱ्यावर आहेत. मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यादरम्यान विरोधी पक्ष, शेतकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलन करू नये म्हणून पोलिसांनी त्यांना स्थानबद्ध केले. मुख्यमंत्री दौऱ्यावर येण्यापूर्वीच पोलिसांनी संभाव्य आंदोलकांना पोलीस ठाण्यात आणले. राज्यात लोकशाही अस्तित्वात नसून ही हुकूमशाही असल्याचा आरोप स्थानबद्ध केलेल्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुधवारी अकोला शहराच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यामध्ये ते विविध अडीच हजार कोटी रुपयांच्या विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करतील. त्यानंतर ते अकोला क्रिकेट क्लब येथे आयोजित जाहीर विकास संवाद सभेला संबोधित करणार आहेत. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका



होऊ घातल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांचा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यादरम्यान विरोधी पक्ष व शेतकरी संघटनांनी आंदोलन करू नये यासाठी पोलिसांनी अगोदरच त्यांच्या पदाधिकाऱ्यांना स्थानबद्ध केले. बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेचे अध्यक्ष व इतर पदाधिकारी, किसान ब्रिगेडचे कार्याध्यक्ष शरद वानखडे, त्यांचे इतर पदाधिकारी, राजेश मिश्रा यांच्यासह विविध विरोधी पक्ष, संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी आज सकाळपासून ताब्यात घेतले. त्यांना शहरातील विविध पोलीस ठाण्यामध्ये स्थानबद्ध करण्यात आले आहेत. या प्रकारावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा देखील अधिकार नसून राज्यात एक प्रकारे हुकूमशाही सुरू असल्याचा आरोप स्थानबद्ध झालेल्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

# तिसरे एल्गार मराठी गजल संमेलन होणार अमरावतीत नाना लोडम यांच्या निवासस्थानी झाली पूर्वतयारी बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

तिसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गजल संमेलन ७ आणि ८ फेब्रुवारी, २०२६ मध्ये अमरावतीत आयोजिण्यात आले असून संमेलनाची पूर्वतयारी बैठक संमेलनाचे यजमानपद भूषविणारे ग़ज़लरसिक नाना लोडम यांच्या जयराम नगरातील निवासस्थानी पार पडली.अंबाजोगाई येथे झालेल्या दुसऱ्या एल्गार मराठी



ग़ज़ल संमेलनात तिसरे संमेलन अमरावतीत आयोजिण्यात येणार असल्याची घोषणा नाना लोडम यांनी केली होती. कवीश्रेष्ठ सुरेश भट यांच्या नगरीत हे ग़ज़ल संमेलन होत असल्याने अमरावती शहरात आनंद व्यक्त होत आहे. सध्या संमेलनाच्या निवडक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या पहिल्याच बैठकीत नाना लोडम यांनी संमेलनाची प्राथमिक रूपरेषा मांडली. यावेळी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे होऊ घातलेल्या संमेलनाचे अध्यक्ष, उद्घाटक, प्रमुख पाहुणे, वक्ते, ग़ज़ल मुशायरे, ग़ज़ल मैफिल, परिसंवाद, संमेलनाची स्मरणिका, निवास आणि भोजन व्यवस्था आदी नियोजनावर सविस्तर चर्चा झाली. बैठकीला नाना लोडम यांच्यासह नीलिमा लोडम, ग़ज़लकार अनंत नांदूरकर ’खलिश’, नितीन देशमुख, नितीन भट, संदीप देशमुख उपस्थित होते.

# ‘लाडक्या बहिणीं’च्या अर्जांची प्राप्तिकर पडताळणी होणार

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.११मुंबई**

राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेतील अर्जांची प्राप्तिकर छाननीसाठी लागणारी माहिती उपलब्ध करून देण्यास केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) तयारी दर्शवली आहे. ही माहिती उपलब्ध झाल्यानंतर सर्व दोन कोटी ६३ लाख लाडक्या बहिणींच्या अर्जांची पडताळणी होणार आहे. परंतु राज्यातील विधानसभा निवडणुकीचे चित्र पलटवणाऱ्या या योजनेची प्राप्तिकर पडताळणी



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होईपर्यंत होण्याची शक्यता कमी आहे.

राज्य सरकारने गेल्या वर्षी जुलैमध्ये ‘लाडकी बहीण’ योजना जाहीर केली. ऑगस्टपर्यंत या योजनेसाठी राज्यातील महिलांचे दोन कोटी ६३ लाख अर्ज आले. सरकारने विविध प्रकारच्या अटी व नियम या योजनेचा लाभ घेण्यासाठी घातले आहेत. यात अर्ज करणाऱ्या बहिणींच्या कुटुंबाचे उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा जास्त असता कामा नये, ही प्रमुख अट आहे. मात्र कुटुंबाचे अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिलांनी अर्ज केल्याचे आढळून आले आहे. यासाठी सहा महिन्यांपूर्वी प्राप्तिकर भरणाऱ्या अर्जदारांच्या कुटुंबाची महिती मागण्यात आली होती.

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या परवानगीशिवाय अशा प्रकारे माहिती देता येणार नाही, असे महिला विकास विभागाला कळविण्यात आले होते. अखेर या मंडळाने परवानगी दिल्याने राज्यातील प्राप्तिकर विभाग अशी माहिती देण्यास तयार झाला आहे. येत्या काळात ही माहिती उपलब्ध झाल्यानंतर लाडक्या बहिणींच्या सर्व अर्जांची पडताळणी होणार आहे.

# अन्नत्याग आंदोलनासाठी विशेष वैद्यकीय पथक दिवसातून दोनवेळा करणार आरोग्य तपासणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

माजी राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी दिव्यांग, शेतकरी, शेतमजूर, विधवा महिला, बेरोजगार युवक, मेंढपाळ आणि मच्छीमार बांधवांच्या विविध मागण्यांसाठी दि. ८ जून पासून मोझरी, ता. तिवसा येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा प्रशासनाने तज्ज्ञ डॉक्टरांचे विशेष पथक तैनात केले आहे.आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने या आंदोलनाची दखल घेत जिल्हा शल्य चिकित्सक आणि वैद्यकीय अधीक्षक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या पथकाला आंदोलक बच्चू कडू आणि इतरांच्या आरोग्याची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत.यासाठी दोन तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक नियुक्त करण्यात आले असून, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील एका तज्ज्ञ डॉक्टरांचाही यात समावेश आहे. हे पथक दिवसातून दोन वेळा आंदोलकांच्या आरोग्याची तपासणी करेल आणि आवश्यक उपाययोजना करून त्याचा अहवाल दररोज दोन वेळा सादर करेल.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी यापूर्वी २४ मे रोजी आणि ४ जून रोजी निवेदन दिले होते. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी याबाबत योग्य ती खबरदारी घेण्याचे आदेश दिले आहेत.

## बच्चूभाऊ कडूंच्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनार्थ कार्यकर्ते चढले थेट टेलिफोन टॉवरवर

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तसेच सातबारा कोरा करण्यासह इतर काही मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीस्थळी बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु केलं आहे. या आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून बच्चू कडू यांच्या आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळत असताना आज बच्चू भाऊंच्या २५ हुन अधिक कार्यकर्त्यांनी आक्रमक पावित्रा घेत थेट टेलिफोन टॉवरवर चढून आंदोलन केले.

दरम्यान, बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु केलेल्या बच्चू भाऊंचा काल बीपी कमी झाल्यानंतर डॉक्टरांची टीम तातडीने उपोषणस्थळी दाखल झाली आणि त्यांनी उपचार करण्यास सुरुवात केली मात्र, बच्चू कडू यांनी कोणताही उपचार घेण्यास स्पष्टपणे नकार दिला आहे. जोपर्यन्त मागण्या मान्य होणार नाहीत तोपर्यंत मी कोणतेही उपचार घेणार नाही अशी भूमिका बच्चू कडू यांनी घेतली आहे.

आज सकाळी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीस्थळी सुरु केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्ये एकत्रित झाले. या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला आहे. तरी देखील आक्रमक झालेल्या बच्चू कडू यांच्या २५ हुन अधिक कार्यकर्त्यांनी थेट टेलिफोन टॉवरवर चढून जोरदार घोषणाबाजी केली. कार्यकर्त्यांनी टॉवरवर चढून सुरु केलेल्या आंदोलनामुळे पोलिसांची चांगलीच धावपळ उडाली.



टेलिफोन टॉवरवर चढून आंदोलन सुरु केलेल्या बच्चू भाऊ यांच्या कार्यकर्त्यांनी जोपर्यंत पूर्ण मागण्या शासनाकडून केल्या जात नाहीत तोपर्यंत टॉवरवरून खाली उतरणार नसल्याचा पावित्रा घेतला आहे. बच्चू कडू यांच्या अन्नत्याग उपोषणाला देशभरातून पाठिंबा मिळत आहे. आतापर्यंत शेतकरी नेते राकेश टिकैत, कराळे मास्टरयांनी आपण बच्चूभाऊंसोबत असल्याचं सांगत पाठिंबा दिला आहे. तर आझाद समाज पार्टीने बच्चू कडू याना पाठिंब्याचे पत्र दिले आहे. याशिवाय, खासदार निलेश लंके, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्ट, संभाजीराजे छत्रपती, अकोल्याचे आमदार नितीन देशमुख, रविकांत तुपकर, सचिन ढवळे, विठ्ठल कांगणे आदी मान्यवर बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनस्थळी भेटी देणार आहेत.

बच्चूभाऊ कडूंच्या अन्नत्याग आंदोलनावेळी माजी सभापती याऊल झाले भावुक; महिला कार्यकर्त्याला अश्रू अनावर(गुरुकुंज मोझरी) १९ ,२६शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तसेच सातबारा कोरा करण्यासह इतर काही मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांचे गेली तीन दिवसांपासून मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीस्थळी बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु आहे. महाराष्ट्रातून बच्चू कडू यांच्या आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळत असताना आज बच्चू भाऊ कडू यांच्या आंदोलनाच्या चौथ्या दिवशी चांदूर बाजार समितीचे माजी सभापती राजेंद्र याऊल यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. बच्चू भाऊंसोबत आरोग्याची विचारपूस करताना याऊल भावुक झाले तर महिला कार्यकर्त्यांना देखील रडू आले. शेतकऱ्यांसाठी अन्नत्याग आंदोलन करणाऱ्या नेत्यासारखा दुसरा नेता शोधूनही सापडणारा नसल्याच्या भावना यावेळी महिला कार्यकर्त्यांनी बोलून दाखवल्या.

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीस्थळी सुरु केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाच्या ठिकाणी चांदूर बाजार समितीचे माजी सभापती राजेंद्र याऊल यांनी भेट देत बच्चू भाऊ यांच्या आंदोलनास पाठिंबा दर्शवला. तसेच पाण्याची बॉटल देत त्यांना पाणी घेऊन आंदोलन सोडण्याची विनंती केली. मात्र, बच्चू कडू यांनी पाणी पिण्यास नकार दिला. त्यानंतर महिला कार्यकर्त्यांनी देखील बच्चू भाऊंना अन्नत्याग करण्याची विनंती केली ,मात्र, त्यांनी नकार देताच महिला कार्यकर्त्याला अश्रू अनावर झाले.

## आर्वी तहसील कार्यालयात 'प्रहार'च्या कार्यकर्त्यांचे अर्धनग्न आंदोलन

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तसेच सातबारा कोरा करण्यासह इतर काही मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांचे गेली तीन दिवसांपासून मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीस्थळी बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु आहे. आज आंदोलनाच्या चौथ्या दिवशी प्रहार पक्षाचे आर्वीतील कार्यकर्त्यांनी आक्रमक पावित्रा घेत थेट आर्वी तहसील कार्यालयात जाऊन अर्धनग्न आंदोलन केले. सरकारने शेतकरी वर्गाला इतके लुटले आहे की आता अंगावरचे कपडे काढायचे बाकी होते, तहसीलदार साहेब शेवटी आमच्या अंगातले कपडे घ्या आणि या गरीब कष्टकरी शेतकऱ्यांना तेवढी कर्जमाफी द्या, अशी मागणी 'प्रहार'च्या कार्यकर्त्यांनी यावेळी केली.




आज सकाळी प्रहार पक्षाचे कार्यकर्ते आर्वीतील तहसील कार्यालयात दाखल झाले. त्यांनी तहसील कार्यालयातील तहसीलदार यांच्या केबिनमध्ये जाऊ न थेट आपले कपडे काढण्यास सुरुवात केली. कार्यकर्त्यांनी अचानक आपले कपडे काढण्यास सुरुवात केल्यानंतर तेढील अधिकाऱ्यांना देखील काही समजेनासे झाले. यावेळी एक एक करत त्या ठिकाणी असलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी आपल्या अंगातील शर्ट काढून तहसीलदार यांच्या समोर ठेवले. कपडे तहसीलदार यांच्या समोर ठेवत कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह इतर मागण्यांचे निवेदन त्याठिकाणी उपस्थित असलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यास दिले.

मोझरी या ठिकाणी बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु केलेल्या बच्चू भाऊंच्या पाठिंब्यासाठी अमरावती तालुक्यात अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांकडून आंदोलने केली जात आहेत. आज आर्वी तहसील कार्यालयात 'प्रहार'च्या कार्यकर्त्यांनी अर्धनग्न आंदोलन करून प्रशासन व सरकारचे लक्ष वेधले. कार्यकर्त्यांच्या या आंदोलनाची तालुक्यासह जिल्ह्यात चांगलीच चर्चा रंगली आहे.

## मोसमी पावसाला पोषक वातावरण; पुढील ३-४ दिवसात राज्यात या ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषि विभागाने केले आहे.

तर राज्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, शेतकरी, मच्छिमार बांधवांनी दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. मोसमी पाऊस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे.

दक्षिण व्दीपकल्पीय भारताच्या भूभागातील कर्नाटकात १२ ते १५ जून दरम्यान आणि कोकण आणि गोवा येथे १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी सादरीकरणाद्वारे दिली.त्यांनी सांगितले की, मोसमी पावसाच्या मार्गक्रमणासाठी अनुकूल वातावरण निर्मिती होण्याची शक्यता येत्या तीन ते चार दिवसांत आहे. त्यानुसार मध्य महाराष्ट्रात १२ जून रोजी मराठवाड्यातील काही भागात १२ ते १४ जून दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे.कोकण, गोवा येथे १२ आणि १५ जून दरम्यान मुसळधार तर १३, १४ जून रोजी अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

या कालावधीत मच्छिमारांनी समुद्रात मासेमारी करण्यासाठी जाऊ नये. वीजांच्या गडगडाटांसह वादळ होत असताना खुल्या मैदानावर काम करु नये.वीजा होताना झाडांच्या खाली आसरा घेऊ नये, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वीज पुरवठा खंडित करुन ठेवावा, ओढा, तलाव, नदी आदी पाण्याच्या स्त्रोतातून तत्काळ बाहेर पडावे, वीज वहन करणाऱ्या सर्व वस्तूंपासून दूर राहावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

## शाळांच्या वेळापत्रकात बदल; आता शाळा सकाळी ७ ऐवजी... ९ वाजता होणार सुरु

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. राज्यातील शाळा येत्या १६ जूनपासून सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांसह पालकांनी शाळा सुरू होण्यापूर्वी तयारी सुरू केली आहे. शाळेसाठी नवीन दप्तर, वॉटर बॉटल, वह्या, पुस्तक खरेदी करणं सध्या सुरू आहे. अशातच शाळांच्या वेळापत्रकाबाबत महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शाळांचे वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. आता शाळा सकाळी सात ऐवजी ९ वाजता सुरू होणार आहे.




महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या शाळांबाबत महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची सुरूवात येत्या १६ जूनपासून होणार आहे. नव्या शैक्षणिक वर्षापासून शाळांच्या वेळापत्रकात बदल होणार आहे. नव्या शैक्षणिक वर्षामध्ये राज्यातील शाळा सकाळी ७ ऐवजी ९ वाजता भरतील आणि सायंकाळी ४ वाजता सुटतील. म्हणजेच सकाळी ९ ते सायंकाळी ४ ही शाळेची वेळ असणार आहे.

शाळांच्या नव्या वेळापत्रकानुसार, सकाळी ९ वाजल्यापासून ते ९.२५ पर्यंत परिपाठ राहिल. ९.२५ ते ११.२४ पर्यंत सुरूवातीचे ३ लेक्चर होतील. ११.२५ पासून ते ११.३५ पर्यंत १० मिनिटांची छोटी सुट्टी असेल. ११.३५ ते १२.५० पर्यंत दोन लेक्चर होतील. १२.५० ते १.३० वाजेपर्यंत मधली सुट्टी होईल. त्यानंतर १.३० ते ३.५५ वाजेपर्यंत उर्वरित लेक्चर होतील. त्यानंतर शेवटच्या ५ मिनिटांमध्ये वंदे मारतम होईल आणि शाळा सुटतील.

दरम्यान, राज्यामध्ये लवकरच शाळांच्या घंटा वाजणार आहे. उन्हाळी सुट्ट्या संपत आल्या असून आता लवकरच शाळा सुरू होणार आहे. महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या शाळा १६ जूनपासून सुरू होणार आहे. तर सीबीएसई बोर्डाची शाळा येत्या ९ जूनपासून सुरू होणार आहे. राज्यातील ११ जिल्हे वगळता सगळीकडे शाळा १६ जूनपासून सुरू होणार आहेत. विदर्भामध्ये इतर विभागांच्या तुलनेत थोड्या उशिराने शाळा सुरू केल्या जातात.

## सहा गावांचा प्रभार एकाच ग्रामपंचायत अधिकाऱ्याकडे

### भातकुली बीडीओ कार्यालयाच्या अधिकाऱ्यांची मनमानी : नागरिकांमध्ये संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

भातकुली पंचायत समिती प्रशासनावर पुन्हा एकदा पक्षपातीपणाचे आरोप होत असून, तब्बल सहा गावांचा कारभार एका ग्रामपंचायत अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. आठवड्याचे केवळ पाचच दिवस काम.त्यापैकी भातकुली कार्यालयात दोन दिवस आणि उर्वरित तीन दिवस गावपातळीवरील कामकाजासाठी देणे अनिवार्य आहे. मात्र सहा गावांची जबाबदारी एकाच अधिकाऱ्यावर दिल्यामुळे प्रत्यक्षात एका गावाचा कारभार महिन्यातून केवळ एकदाच पाहिला जातो आहे का असा प्रश्न गावकऱ्यांनी उपस्थित केलेला आहे. या अव्यवस्थेमुळे विद्यार्थ्यांचे शाळा दाखले, नागरिकांचे उत्पन्न व राहण्याचे दाखले, वृद्धांच्या निवृत्तीवेतन संदर्भातील कामकाज यावर विपरित परिणाम होत आहे. दुसरीकडे, या ग्रामसेवकाचे स्थानिक कंत्राटदार व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी असलेले सलोख्याचे संबंध लक्षात घेता, हा प्रभार मुद्दामच त्याच्यावर सोपवण्यात आल्याची चर्चा आहे.स्थानिक नागरिकांच्या मते, ग्रामपंचायत अधिकारी कार्यालयात अनुपस्थित असल्यामुळे शासकीय योजनेच्या लाभासाठी अर्ज सादर करता येत नाहीत. कामासाठी वारंवार तहसील किंवा तालुका कार्यालयात चकरा माराव्या लागत आहेत. यामुळे ग्रामविकासाच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होत असून, याचा थेट फायदा कंत्राटदारांना होत आहे, असे आरोप नागरिकांनी केले. या आधी पाच गावांचा प्रभार असतांना नुकताच त्यांना अजून एका गावाचा प्रभार सुद्धा संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांचेकडे देण्यात आला. पंचायत सनीतीचे बीडीओ, विस्तार अधिकारी या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या 'पार्टीचे' भागीदार असल्याने अहवाल सुद्धा अत्यंत चांगलाच मिळतो अशी चर्चा सुरू आहे.या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या विरोधात अनेकदा तक्रारी करून सुद्धा नेहमी प्रशासन खिशात असल्यामुळे आजवर या ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही हे विशेष!

**निष्काळजी प्रशासनावर कारवाईची मागणी**

या सर्व प्रकाराची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

## ग्रीस्टॅक नोंदणीशिवाय शासनाच्या सुविधेचा लाभ मिळणार नाही - जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ११ अमरावती**

केंद्र शासनाची ग्रीस्टॅक योजना जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना नोंदणीनंतर प्राप्त होणारा शेतकरी ओळख क्रमांक अत्यंत महत्वाचा आहे. प्रत्येक योजनेमध्ये सहभाग अथवा लाभ मिळविण्याकरीता शेतकरी ओळख क्रमांक आवश्यक असणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी प्रथम प्राधान्याने नागरी सुविधा केंद्रमध्ये जावून शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.कृषि क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या अनेक महत्त्वपूर्ण योजना योग्य आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचवून कृषि क्षेत्राचा अधिकाधिक विकास होण्यासाठी ग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. ग्रीस्टॅक हे कृषि क्षेत्रात डेटा आणि डिजीटल सेवा वापरून शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यापर्यंत जलद गतीने आणि परिणामकारकरित्या पोहचण्यासाठी स्थापित केलेले जाणारे डिजीटल फाउंडेशन आहे.ॲग्रीस्टॅक अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्याची सुविधा नागरी सुविधा केंद्रामार्फत देण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी नागरी सुविधा केंद्रामध्ये जाऊन सातबारा, आठ अ, आधार क्रमाकांशी संलग्न असलेल्या मोबाईलसह संपर्क साधवा. यात मोबाईल क्रमांक आधार क्रमांकाशी संलग्न असणे अत्यंत महत्वाचे आहे. नोंदणी करीत असताना आधारशी संलग्न असणाऱ्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी, तसेच नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यावर स्वतःचा शेतकरी ओळख क्रमांक याच मोबाईलवर संदेशाद्वारे प्राप्त होणार आहे. सदर शेतकरी ओळख क्रमांक अत्यंत महत्वाचा असल्याने शेतकऱ्यांनी जपुन ठेवावा. जेणेकरुन शेतीसंबधी मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहणार नाही.



## श्री लक्ष्मीनारायण संस्थानच्या दिंडीचे शनिवारी पंढरपूरकरकडे प्रस्थान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक आणि धार्मिक वैशिष्ट्य असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील रथामागे १४ व्या क्रमांकावर असलेली श्री. लक्ष्मीनारायण संस्थानच्या मानाच्या दिंडीचे शनिवार दि. १४ जून रोजी दुपारी ४ वाजता लक्ष्मीनारायण मंदिर, भाजीबाजार येथून प्रस्थान होत असल्याची माहिती संस्थानच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकारपरिषदेत देण्यात आली.

संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज यांचे वडील विठ्ठलपंत कुलकर्णी हे आषाढी एकादशी निमित्ताने पंढरपूर येथे पायी वारी करीत असत असे संदर्भ मिळतात. त्यांच्यानंतर ज्ञानेश्वर व भावंडे यांनी वारीची परंपरा सुरू ठेवली. १८३२ मध्ये श्री गुरू हैबतबाबांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका पालखीत घालून दिंडी-समारंभासह, थाटाने ऐश्वर्याने व सोहळ्याने पंढरपूरला नेण्याची प्रथा चालू केली. तिला आज आणखी वैभव प्राप्त झाले आहे. श्री ज्ञानदेवांच्या पालखी सोहळ्यास पूर्वी हत्ती, घोडे वगैरे लवाजमा श्रीमंत राजेसाहेब (आँध) यांच्याकडून येत असे. या खर्चास साहाय्य त्या त्या वेळचे राजे व श्रीमंत पेशवे सरकार करीत असे.



पुढे कंपनी सरकारचा अंमल सुरू झाल्यावरही खर्चाची तरतूद सरकारकडून होत असे. सरकारने इ.स. १८५२ मध्ये पंचकमिटी स्थापन करून त्या कमिटीच्या नियंत्रणाखाली ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीची व्यवस्था केली.श्री. हैबतबाबांनी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सुरू केला. या सोहळ्यात विदर्भात सद्गुरू प.पू.श्री. राजाधिराज स्वामी विठ्ठलानंद सरस्वती यांनी दिंडी नेण्यास प्रारंभ केला. विदर्भातून आज अनेक दिंड्या पंढरपूरला जातात. श्री. लक्ष्मीनारायण संस्थान, अमरावती यांची मानाची दिंडी गेल्या १६० वर्षांपासून संत ज्ञानेश्वर महाराज पालखीसोबत पंढरपूरला जाते. महाराष्ट्राच्या मुख्य धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचा वसा विदर्भात प.पू. सद्गुरू विठ्ठलानंद सरस्वती यांनी जपला होता. आजही संस्थानतर्फे पंढरपूरला दिंडी नेण्याची परंपरा अखंडपणे चालू आहे.यंदाचा १९३ वा संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दिनांक १९ जून पासून प्रारंभ होत आहे. श्री. लक्ष्मीनारायण संस्थानची अमरावतीकर दिंडी रथामागे क्रमांक १४ या दिंडीचे प्रस्थान शनिवार दिनांक १४ जून रोजी दुपारी ४ वाजता भाजीबाजार स्थित श्री. लक्ष्मीनारायण मंदिरातून होणार आहे. प्रस्थानपूर्वी दुपारी ३ वाजता मंदिरात ह.भ.प.श्री.पद्माकर महाराज देशमुख यांचे प्रवचन होईल. त्यानंतर दिंडी प्रस्थान सोहळ्यास प्रारंभ होईल. या सोहळ्यात संस्थानच्या खारतळेगाव येथिल दत्त मंदिराचे भक्त मोठ्या संख्येने सहभागी होतात.दुपारी ४ वाजता श्री. लक्ष्मीनारायण मंदिरातून दिंडीचे प्रस्थान झाल्यावर सर्वप्रथम यापूर्वी अनेक वर्षे दिंडी चालक सेवा दिलेले स्व. नारायणराव व्यास यांच्या कुंभारवाडा स्थित निवासस्थानी महाराजांच्या पादुकांचे पूजन होईल. दिंडींचा प्रवास पुढे सुरू होतो.

## अमरावती शहरात १० जून जागतिक नेत्रदान दिवसा निमित्ताने जनजागृती रॅली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

आज सायंकाळी अमरावती शहरात नेत्रदान दिनानिमित्त हरीना नेत्रदान फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने नेत्रदान जनजागृती रॅली काढण्यात आली.हातात तिरंगा घेऊन या रॅलीमध्ये माजी खासदार अनंत गुढे, शहरातील विविध सामाजिक संघटना व विविध क्षेत्रातील गणमान्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.समाजात अनेक बांधव अंध आहेत त्यांनीही हे सुंदर जग बघावे म्हणून त्यांच्यासाठी नेत्रदान करण्यासाठी जनजागृती करण्यात आली.